महाराष्ट्र शासन

# शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व अतिविशेषोपचार रुग्णालय, छत्रपती संभाजीनगर

## Government Medical College & Super Speciality Hospital, Chhatrapati Sambhajinagar

कार्यालय पत्ता :- अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय परिसर, पानचक्की रोड, छत्रपती संभाजीनगर ४३१००१

कार्यालय ईमेल पत्ता- ssblockgmcha20@gmail.com कार्यालय दुरध्वनी क्र ०२४०-२९५३६०४

जा.क्र.शावैमअविरुछसं/ETP & STP Plant/ 16 /२०२६, दिनांक - 05/01/2026

**दरपत्रक मागणी पत्र**

प्रति,

-------------------------

-------------------------

विषय:- दरपत्रक मोहरबंद लिफाफे सादर करणेबाबत.

शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व अतिविशेषोपचार रुग्णालय छत्रपती संभाजीनगर या संस्थेमध्ये स्थापित परंतू बंद स्थितीत असलेला ETP & STP प्लान्ट कार्यान्वित करुन घेण्यासाठी मा.अधिष्ठाता यांनी मौखिक आदेश दिलेले असून त्यासाठी विहित पध्दतीने दरपत्रक प्रक्रिया करुन दरपत्रक मोहोरबंद लिफाफे मागविण्यात येत आहे. दरपत्रकधारक या कार्यालयास मागणी केलेले उपरोक्त प्लान्टची सर्वसमावेशक देखभाल व दुरुस्ती करार करण्यासाठी खालील अटी व शर्तीच्या अधिन राहुन इच्छुक असल्यास आपला दरपत्रक मोहरबंद लिफाफा विहित मुदतीत या कार्यालयाच्या नोंदणी (आवक विभाग) शाखेत सादर कराव्या.

**अटी व शर्ती.**

१) पदपत्रक मोहोरबंद लिफाफा दि.१६/०१/२०२६ रोजी सायं०४ :०० वाजेपर्यंत कार्यालयास पोहोचतील या बेताने पाठवावे, जाहिर केलेल्या तारखेनंतर अथवा कार्यालयीन वेळेनंतर आलेले दरपत्रक विचारात घेतले जाणार नाही/ग्राहय धरले जाणार नाही.

२) दरपत्रक मोहोरबंद लिफाफा "अधिष्ठाता" शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व अतिविशेषोपचार रुग्णालय छत्रपती संभाजीनगर यांचे नावे विहित कार्यालयास सादर करावा. त्याच प्रमाणे दरपत्रक मोहोरबंद लिफाप्यावर भांडार विभाग हे नाव लिहावे. जमा करण्याचा अंतिम दिनांक, दरपत्रक धारकाच्या नावाचा शिक्का इ. नमुद असणे आवश्यक आहे.

३) प्राप्त झालेली दरपत्रक मोहोरंबद लिफाफे दि.१९/०१/२०२६ रोजी संस्थेच्या भांडार विभागामार्फत खरेदी समिती समोर उघण्यात येतील. आपणांस जर दरपत्रक मोहरबंद लिफाफे उघडण्याच्या प्रक्रियेत सहभाग घ्यावयाचा असल्यास नियोजित वेळेत स्वखर्चाने उपस्थित रहावे.

४) प्रस्तावित सर्वसमावेशक देखभाल व दुरुस्ती करारासाठी दरपत्रकात आकारण्यात आलेले दर हे बाजारभावापेक्षा अधिक नसावेत. सर्वात कमीत कमी दराचे दरपत्रकाचा विचार करण्यात येईल.

५) दरपत्रकात शासन नियमानुसार विहित असलेले सर्व करांसहित एकुण दर नमुद करण्यात यावेत दरपत्रकात खाडाखोड करण्यात येवु नये.

६) दरपत्रक ग्राहय/वैध कालावधी हा पुरवठा आदेश नोंदविलेल्या दिनांकापासुन सहा (६) सहा महिन्यांचा राहील.

७) दरपत्रक सिलबंद लिफाफ्यात सादर करावयाचे दस्ताऐवज:- जीएसटी क्रमांक असलेल्या अधिकृत लेअर हेडवर दरपत्रक सादर करावे. त्यासोबत (१) दुकानाचा परवाना (२) व्यवसाय नोंदणी प्रमाणपत्र (३) जीएसटी प्राधिकारपत्र (४) पॅन कार्डची छायांकीत प्रत (५) आधारकार्डची छायांकीत प्रत.

**८) देयकाची अदागयी :- संस्थेस सर्वसमावेशक देखभाल व दुरुस्तीचे कामकाज पुर्ण झाल्याचा अहवाल सादर केल्यानंतर जेव्हा शासनाकडुन अनुदान मंजुर प्राप्त होईल त्यावेळेस देयकाची अदागयी करण्यात येईल.**

अधिष्ठाता,
( डॉ.शिवाजी सुक्रे )
शासकिय वैद्यकिय महाविद्यालय, व अतिविशेषोपचार रुग्णालय
छत्रपती संभाजीनगर

प्रत,

१) मा. आयुक्त (वैद्यकिय), वैद्यकिय शिक्षण व संशोधन, मुंबई यांना माहीतीस्तव सविनय सादर.

२) संस्थेचे सुचना फलक/संकेतस्थळ www.gmcaurangabad.com (जाहीर नोटीस) शा.वै.म.व. अतिविशेषोपचार रुग्णालय छत्रपती संभाजीनगर.